**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणी करणाऱ्या जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मध्ये कामाची जबाबदारी निश्चित करणेबाबत .....**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :आस्थाप-२०१७/प्र.क्र. १०२/मग्रारो-३**
१६ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ सप्टेंबर, २०१७.

<u>वाचा</u>:- १) नियोजन विभाग शासन परिपत्रक क्र. आस्थाप-२०१३/प्र.क्र.४/रोहयो-३, दिनांक ११.२.२०१३.
२) नियोजन विभाग शासन परिपत्रक क्र. आस्थाप-२०१४/प्र.क्र.१६४/मग्रारो-३, दिनांक ०६.०९.२०१४.
३) नियोजन विभाग शासन परिपत्रक क्र. आस्थाप-२०१७/प्र.क्र.६७/मग्रारो-३, दिनांक ०९.०५.२०१७.

**शासन निर्णय :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही ग्रामीण भागात अकुशल रोजगार उपलब्ध करुन देणारी महत्वाची योजना आहे. या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील जास्तीत जास्त लोकांना मिळावा व ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करुन देण्याबरोबर शाश्वत संसाधनाची निर्मिती करणे हा योजनेचा मूळ उद्देश आहे. यामध्ये सामुदायिक कामाबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजना जसे सिंचन विहीरी, शेततळे, फळबाग लागवड, गांडूळ खत, शोष खड्डे इत्यादी कामांवर भर देण्यात आला असून, अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती, अल्पभूधारक, दारिद्रय रेषेखालील लाभार्थी, प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेचे लाभार्थी अशा सर्वांचा समावेश करण्यात आला आहे. यातून “समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजना” सुरु करण्यात आली. राज्यामध्ये सुरु असलेला जलयुक्त शिवार कार्यक्रम व त्या माध्यमातून महाराष्ट्र

टंचाईमुक्त करण्याचा राज्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी मनरेगाशी अभिसरण करुन भरीव कामाची अपेक्षा आहे.

उपरोक्त कामामध्ये गतिमानता व सुलभता यावी म्हणून मगांराग्रारोहयोजनेच्या अंमलबजावणीत सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना आवश्यक अधिकार प्रदान करणे तसेच जिल्हा परिषदेतील नरेगा कक्ष व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या कामाच्या विभागणीबाबत सविस्तर सूचना संदर्भाधीन दि.०६.०९.२०१४ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. तथापि उपरोक्त सूचनानुसार संबंधित कार्यालयातून कार्यवाही होत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असल्यामुळे करावयाची कामे व त्याची विभागणी व जबाबदारी निश्चित करणे याकरीता सर्व समावेशक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत करावयाच्या कामाची जबाबादारी खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | करावयाची कामे | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|
| १ | (i) **<u>जॉबकार्ड छपाई, वाटप, तपासणे व अद्यावत करणे</u>**<br>यासंदर्भात शासन निर्णय / परिपत्रक दिनांक २५.०७.२०१२, ८.१२.२०१४ २३.०२.२०१६ व दिनांक २३.०८.२०१६ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| | **(ii)** नमुना १ व नवीन जॉब कार्डची (ज्यांनी काम केले आहे अशा मजूरांसाठी) आवश्यकतेप्रमाणे छपाई करणे व ग्राम पंचायतीला वेळेत पोहोचविणे. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मगांराग्रारोहयो/पंचायत समिती) |
| | **(iii)** जिल्हा स्तरावर डिजीटल फोटोग्राफीचे बाजार दराची चौकशी करुन दर निश्चित करणे व जॉब कार्डच्या आवश्यकतेनुसार फोटो काढणे. | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मगांराग्रारोहयो/पंचायत समिती) |
| २ | <u>SECC Data **मधील भूमिहीन कुटुंबांचे सर्वेक्षण**</u><br>केंद्र शासनाच्या ग्राम विकास मंत्रालय यांच्या दिनांक २०.०३.२०१७ च्या पत्रान्वये SECC सर्वेक्षणा अंतर्गत भूमिहीन मजूरांना दि. ३०.०६.२०१७ पर्यंत जॉबकार्ड देण्याचा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक *(प्रकल्प संचालक यांनी SECC data सर्वेक्षणाच्या अद्यावत माहितीबाबत नियोजन करावे)* |

| | | |
|---|---|---|
| | सूचना देण्यात आलेल्या आहेत. तद्नुसार जॉब कार्ड देणे. | |
| ३ | <u>**कामाची मागणी**</u><br>महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ (दिनांक ६.०८.२०१७ पर्यंत सुधारीत) अनुसूची ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जॉबकार्डधारक प्रौढ व्यक्ती योजनेअंतर्गत अकुशल काम करण्यासाठी अर्ज करण्यास हकदार असेल अशा अर्जाची नोंद करणे व कामासाठीचा अर्ज ग्रामपंचायतीकडे किंवा शासनाकडे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा दुरध्वनीवरुन किंवा संसाधन केंद्रामार्फत किंवा संकेतस्थळावरुन किंवा राज्य शासनाने अधिकृत केलेल्या कोणत्याही साधनामार्फत मौखिक किंवा लेखी स्वरुपात कामाची मागणी करणे. | ग्रामपंचायत आणि कार्यक्रम अधिकारी प्रत्येक अर्जदाराला त्याचा अर्ज मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत काम पुरविल. |
| ४ | <u>**बेरोजगार भत्ता**</u><br>नोंदणीकृत वैध जॉबकार्डधारक व्यक्तीने अधिनियमाअंतर्गत ग्रामपंचायतीकडे किंवा कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी यांच्याकडे रोजगार मिळावा असा अर्ज दिला असेल तर अर्ज मिळाल्याचा दिनांकापासून १५ दिवसांच्या आत ज्या व्यक्तींना रोजगार देण्यात आला नसेल अशी व्यक्ती राज्य शासनाने विनिर्दिष्ट करील अशा दराने व अशा दिवसांकरिता बेरोजगार भत्ता पात्र असेल, अशा सूचना शासन अधिसूचना दिनांक १.०४.२०१३ अन्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार १५ दिवसाच्या आत रोजगार उपलब्ध न झाल्यास विलक्षीत प्रकरणामध्ये जबाबदारी निश्चित करणे. | <u>**ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यंत्रणेकरीता**</u> - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी.<br><u>**इतर यंत्रणेच्या कामांकरीता**</u> - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी. |

| | | |
|---|---|---|
| ५ | **रोजगार दिवस -**<br>योजनेअंतर्गत काम करणाऱ्या मजूरांना त्यांच्या हक्काची जाणीव व्हावी योजना अधिकाधिक पारदर्शक करण्यासाठी तसेच मजूरांना योजनेविषयी सखोल माहिती व्हावी यासाठी केंद्राच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये रोजगार दिनाचे आयोजन प्रत्येक महिन्यातून एका निश्चित दिवशी करण्याचे निर्देश शासन परिपत्रक दि.५.०९.२०१४ अन्वये देण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक व जिल्हा परिषद यंत्रणा |
| ६ | **वेतन चिठ्ठी**<br>योजनेअंतर्गत ग्रामपंचायती मधील मजूरांना वेतन चिठ्ठी वितरीत करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १२.०८.२०१३ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक मजूराला त्यांनी आठवडयामध्ये केलेल्या कामाकरीता मिळालेल्या मोबदल्याच्या संदर्भात वेतन चिठ्ठी देणे आवश्यक आहे. सदर वेतन चिठ्ठी ग्राम रोजगार सेवकांनी मजूरांना देणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक व जिल्हा परिषद यंत्रणा |
| ७ | **ई मस्टर**<br>केंद्र शासनाच्या दिनांक ०५.०२.२०१३ च्या पत्रान्वये नरेगा अंतर्गत १.४.२०१३ पासून संपूर्ण राज्यात ई मस्टर सुरु करण्याचे सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन परिपत्रक दिनांक १५.०२.२०१२ अन्वये MIS करीता मस्टर ट्रॅकर सुरु करण्यात आले असून त्याबाबत सूचना देण्यात आलल्या आहेत. त्यानुसार ई-मस्टरचा वापर अनिवार्य आहे. | **ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यंत्रणेकरीता** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>**इतर यंत्रणेच्या कामांकरीता** - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |

| | | |
|---|---|---|
| ८ | **लेबर बजेट तयार करणे**<br>• योजनेअंतर्गतच्या कामाचा आराखडा तसेच लेबर बजेट तयार करण्याच्या सूचना शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात येतात. तद्नुसार कार्यवाहीचा तपशील जबाबदार अधिकारी खालीलप्रमाणे राहील. | |
| | (i) आयुक्त नरेगा यांनी लेबर बजेट तयार करण्याबाबत जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे. | आयुक्त मगांराग्रारोहयो |
| | (ii) आयुक्त नरेगा यांच्याकडून निश्चित करुन देण्यात आलेले व www.nregalb.org या वेबसाईटवर उपलब्ध प्रपत्रे यांचे ग्रामपंचायत निहाय Print-out काढणे व वितरीत करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा / ग्रामपंचायत ) संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, BDO (NREGA) |
| | (iii) सरपंच,ग्रामसेवक ग्रामरोजगार सेवक व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण | गटविकास अधिकारी / तहसिलदार |
| | (iv) ग्रामपंचायतच्या बैठकीमध्ये लेबर बजेटबाबत चर्चा करणे | गटविकास अधिकारी व तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी (ग्राम पंचायत ) व यंत्रणेचे अधिकारी |
| | (v) दि.१५ऑगस्ट रोजी ग्रामसभेस लेबर बजेट सादर करणे | ग्रामसेवक यांनी MGNREGA क्षेत्रिय नियोजन अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली किंवा विस्तार अधिकारी (ग्रामपंचायत) व यंत्रणेचे अधिका-यासोबत |

| | | |
|---|---|---|
| | (vi) गट विकास अधिकारी ग्रामपंचायत स्तरावरील लेबर बजेट संकलीत करतील. यंत्रणेच्या बजेट तहसिलदार संकलित करुन ते पंचायत समितीचे मासिक सभेची मान्यता घेण्यासाठी सादर करतील.<br>गट विकास अधिकारी ग्राम पंचायत व यंत्रणेचे लेबर बजेट एकत्रित संकलन करुन त्यास ६०:४० चे प्रमाण राखून पंचायत समिती मासिक सभेची मंजूरी घेऊन ते जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांचेकडे सादर करतील. जिल्हाधिकारी सर्व तालुक्यांचे लेबर बजेट एकत्रित संकलित करुन व ६०:४० चे प्रमाण राखून ते जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मंजूरी घेण्यासाठी जिल्हा परिषदेकडे सादर करतील. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक जिल्हा परिषद हे सर्वसाधारण सभेची मंजूरी घेऊन ते शासनास सादर करतील. | |
| ९ | Mission Water Conservation :<br>या अंतर्गत जलयुक्त शिवार, MGNREGA योजनेची अभिसरणाव्दारे कामे करणे.<br>जिल्हाधिकाऱ्यांनी Mission Water Conservation या कार्यक्रमाची जलयुक्त शिवार सोबत सांगड घालून पूर्ण जिल्हयाचा | जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |

| | | |
|---|---|---|
| | GSDA व MRSAC मदतीने Treatment Potential Plan तयार करणे व या आराखडयानुसार कामे हाती घेणे. | |
| १० | **<u>केंद्राचा प्राधान्य कार्यक्रम योजना :</u>**<br>केंद्र शासनाने Focus Area अंतर्गत निश्चित केलेले कार्यक्रम<br>· IHHL,<br>· Form Pond,<br>· Vermi Composting,<br>· Nadep Composting,<br>· Plantation<br>वरील कामांकरीता लक्ष्य निर्धारीत केलेले आहे. या कामांसह समृध्द महाराष्ट्र जन कल्याण योजनेतील ११ प्रकारच्या कामांसाठी राज्य शासनाने २०१६-१७ व २०१७-१८ करिता निर्धारित केलेले उद्दीष्ट पूर्ण करणे. | **<u>ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यंत्रणेकरीता</u>** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>**<u>इतर यंत्रणेच्या कामांकरीता</u>** - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| ११ | (i) **<u>प्रोजेक्ट लाईफ-MGNREGA</u>** : प्रोजेक्ट लाईफ - MGNREGA अंमलबजावणीबाबत आयुक्त नरेगा नागपूर यांनी दिनांक २२.६.२०१५ च्या पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत.तद्नुसार नरेगा अंतर्गत काम करणाऱ्या मजूरांची कौशल्य वृध्दी व्हावी व ते स्वत:चा व्यवसाय करुन उपजिविका चालविण्यास सक्षम व्हावे या दृष्टीकोनातून केंद्र शासनाने प्रोजेक्ट लाईफ-MGNREGA हा उपक्रम हाती घेतला आहे. त्याची अंमलबजावणी करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br><br>प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा |
| | (ii) **<u>प्रधानमंत्री आवास योजना</u>** : प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मग्रारोहयो अंतर्गत येणाऱ्या घटकाचे काम करणे, वेळेवर हजेरीपत्रक भरणे, १५ दिवसामध्ये मजूरी देणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा |

| | | |
|---|---|---|
| | (iii) **स्वच्छ भारत मिशन अंतर्गत वैयक्तिक शौचालय:** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार (letter dt.१९.०१.२०१५) सदर योजनेसाठी रु.१२,०००/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानुसार शौचालय बांधणे, हजेरीपत्रक वेळेवर भरणे, १५ दिवसामध्ये मजूरी अदा करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा सह जिल्हा समन्वयक.<br><br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छता व पाणीपुरवठा) |
| १२ | **राज्याचा प्राधान्य कार्यक्रम :** | |

**समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजना :**

नियोजन विभाग (रोहयो) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो-२०१७/प्र.क्र.३२/रोहयो-७, दिनांक ३१.०७.२०१७ अन्वये सन २०१६-२०१७ पासून खालील नमूद केलेल्या कामांचा ११ कलमी कार्यक्रम दि. ०१.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये व्यापक प्रमाणात राबविण्यात येत आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे अंमलबजावणी व जबाबदार यंत्रणा राहतील.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | अंमलबजावणी व जबाबदार यंत्रणा |
|---|---|---|
| १ | अहिल्यादेवी सिंचन विहीर | ग्रामपंचायत (उपअभियंता, जिल्हा परिषद) व इतर यंत्रणा (संबंधित अधिकारी) |
| २ | अमृतकुंड शेततळे | कृषी विभाग यंत्रणेकरीता (तालुका कृषी अधिकारी) / जिल्हा परिषद ग्रामपंचायत यंत्रणा (कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद) |
| ३ | भूसंजिवनी व्हर्मी कंपोस्टिंग | कृषी विभाग (तालुका कृषी अधिकारी) / ग्रामपंचायत (जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परिषद) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ४ | भूसंजिवनी नाडेप कंपोस्टिंग | कृषी विभाग (तालुका कृषी अधिकारी) / ग्रामपंचायत (जिल्हा कृषी अधिकारी, जिल्हा परिषद) | |
| | ५ | कल्पवृक्ष फळबाग लागवड | कृषी विभाग (तालुका कृषी अधिकारी) कोकण विभागासाठी (कृषी विभाग व ग्रामपंचायत) | |
| | ६ | निर्मल शौचालय | जिल्हा परिषद ग्रामपंचायत यंत्रणा | |
| | ७ | निर्मल शोषखड्डे | जिल्हा परिषद ग्रामपंचायत यंत्रणा | |
| | ८ | समृध्द गाव तलाव / पारंपारीक पाणीसाठयाचे नुतनीकरण व गाळ काढणे | जिल्हा परिषद व इतर यंत्रणा | |
| | ९ | इतर समृध्द जलसंधारण कामे | कृषी विभाग, तालुका कृषी अधिकारी / लघु पाटबंधारे (जिल्हा परिषद स्तर/स्थानिक स्तर / राज्यस्तर) व इतर यंत्रणा | |
| | १० | रोपांची निर्मिती | सामाजिक वनीकरण (लागवड अधिकारी वनक्षेत्रपाल) व वन विभाग | |
| | ११ | वृक्ष लागवड, संगोपन व संरक्षण | सामाजिक वनीकरण (लागवड अधिकारी वनक्षेत्रपाल) / जिल्हा परिषद ग्रामपंचायत यंत्रणा / वन विभाग | |

| | | | |
|---|---|---|---|
| | १२ | ग्राम सबलीकरणाची समृध्द ग्राम योजना (क्रीडांगणे /अंगणवाडी /स्मशानभूमी सुशोभीकरण [स्मशानभूमी ओटा व शेड बांधकाम, स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता व वृक्ष लागवड] / ग्रामपंचायत भवन / घरकुल / गावांतर्गत रस्ते/ गुरांचा गोठा / कुक्कुटपालन / शेळीपालन शेड / मत्स्यव्यवसाय ओटे) | जिल्हा परिषद ग्रामपंचायत यंत्रणा व इतर यंत्रणा |
| १३ | | **विलंब आकार :**<br>योजनेअंतर्गत विलंबाने अदा करण्यात येणाऱ्या मजूरीवर नुकसान भरपाई प्रतिदिन देय मजूरीवर ०.०५ % मजूराला देय ठरविण्याचा शासन निर्णय दिनांक २६.०२.२०१४ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.<br>तसेच यासंदर्भात शासन परिपत्रक दिनांक ०६.०४.२०१५ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. | **ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यंत्रणेकरीता** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>**इतर यंत्रणेच्या कामांकरीता** - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| १४ | | (i) केंद्र शासनाचे पत्र दिनांक १७.०८.२०१७ व शासन परिपत्रक दि. ०४/०९/२०१७ नुसार हजेरीपत्रक निर्गमित केल्यापासुन ३० दिवसाच्या आत MIS मध्ये नोंदणी करणे. | **ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यंत्रणेकरीता** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>**इतर यंत्रणेच्या कामांकरीता** - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| | | (ii) हजेरीपत्रकाची ३० दिवसाच्या आत MIS मध्ये नोंदणी न झाल्यास व मजूराचे देयक प्रलंबित राहिल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणे. | **ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यंत्रणेकरीता** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>**इतर यंत्रणेच्या कामांकरीता** - जिल्हाधिकारी तथा जिल्हा |

| | | |
|---|---|---|
| | | कार्यक्रम समन्वयक |
| १५ | <u>जॉबकार्ड व आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न करणे (Aadhar Base payment system) :</u><br>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गतच्या मजूरांसाठी आधार क्रमांक नोंदणी तसेच आधार सिडींग बाबत सविस्तर सूचना आयुक्त नरेगा, नागपूर यांच्या स्तरावरुन दिनांक २४.०२.२०१५ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करणे. तसेच, केंद्र शासनाच्या सन २०१७-१८ च्या मास्टर सर्क्युलर नुसार जॉबकार्ड व आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| १६ | <u>सामाजिक अंकेक्षण (Social Audit) :</u><br>शासन निर्णय दिनांक १३.११.२०१४ अन्वये कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. तद्नुसार सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया राबविणे. | जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| १७ | <u>ओम्बुड्समन (Ombudsman):</u> यासंदर्भात शासन परिपत्रक दिनांक १३.०८.२०१४ अन्वये ओम्बुड्समन (Ombudsman) ची नियुक्ती व त्यांच्या कामकाजाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तद्नुसार कार्यवाही करणे. | जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| १८ | <u>तक्रार निवारण (Grievances and Redressal):</u><br>रोहयो प्रभागाने दिनांक ४.०७.२०१४ च्या अधिसूचनेन्वये "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र तक्रार निवारण नियम, २०१४" निर्गमित केले आहे. तद्नुसार कार्यवाही करणे. | जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |

| | | |
|---|---|---|
| १९ | **ग्रामपंचायत स्तरावर ७ प्रकारच्या नोंदवहया**<br>ग्रामपंचायत / पंचायत समिती / जिल्हा परिषद / कार्यान्वयीत यंत्रणांकडील केंद्र शासनाच्या दिनांक ५.१०.२०१६ (इंग्रजी) दिनांक ३.११.२०१६ (हिंदी) च्या परिपत्रकानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ७ प्रकारच्या नोंदवहया ठेवणे व त्यामधील नोंदी अद्यावत करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| २० | **अपूर्ण कामे पूर्ण करणे**<br>योजनेअंतर्गत अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय दिनांक ०४.०७.२०१२ व शासन परिपत्रक दिनांक १६.११.२०१२ अन्वये ठरवून देण्यात आलेली आहे. तद्नुसार अपुर्ण कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. | **ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यंत्रणेकरीता** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>**इतर यंत्रणेच्या कामाकरीता** - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| २१ | **निर्मित मत्तांचे (Geotagging) :**<br>नरेगा कामामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी भारत सरकारने Geo MGNREGA अंतर्गत निर्मित मत्तांचे भौगोलिक माहिती प्रणालीव्दारे Geotagging करणे अनिवार्य केले आहे. तद्नुसार ग्रामपंचायत / पंचायत समिती / जिल्हा परिषद / कार्यान्वयीत यंत्रणांकडील पूर्ण झालेल्या कामांचे Asset ID Generate करणे व Geotagging पूर्ण करणे. | **ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यंत्रणेकरीता** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>**इतर यंत्रणेच्या कामांकरीता** - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| २२ | **प्रशासकीय खर्च ६ टक्के :**<br>६% खर्चाची विभागणी करताना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रशासकीय खर्च करण्याबाबतच्या सविस्तर सुचना दिनांक | जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक |

| | | |
|---|---|---|
| | ०४.०६.२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रकात प्रशासकीय खर्चास अनुज्ञेय बाबी, राज्य पातळीवर खर्च करावयाच्या बाबी, विभागीय आयुक्त कार्यालयाने खर्च करावयाच्या बाबी, जिल्हाधिकारी कार्यालयाची जबाबदारी व प्रशासकीय खर्चाचे वार्षिक नियोजन याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.<br>उपरोक्त दिनांक ४.६.२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये ६% खर्चाची विभागणी करताना ०.१० % जिल्हा परिषद नरेगा कक्ष व ०.९० % जिल्हाधिकारी कार्यालय रोहयो शाखा अशी करण्यात आली आहे. त्याऐवजी आता ०.७०% जिल्हा परिषद नरेगा कक्ष व ०.३०% जिल्हाधिकारी कार्यालय, रोहयो शाखा अशी करावी. या प्रमाणामध्ये बदल करावयाचा असल्यास विभागीय आयुक्त यांची मान्यता घेण्यात यावी.<br>सद्य:स्थितीत जिल्हा परिषद नरेगा कक्षाची देयके उपजिल्हाधिकारी (रोहयो) व सहायक लेखाधिकारी (रोहयो) यांचेकडे मुख्य कार्यकारी अधिकारी हे देयके पाठवितात. त्यानंतर त्याचा FTO उपजिल्हाधिकारी (रोहयो) सहायक लेखाधिकारी (रोहयो) हे Generate करुन तेवढी रक्कम जिल्हा परिषद नरेगा कक्षाला देतात. त्याऐवजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत / नरेगा), सहायक लेखाधिकारी (जिल्हापरिषद) यांनी DSC देऊन त्यांना FTO Generate करुन सादील खर्च करण्याची परवानगी देण्यात येत आहे.<br>६% खर्चासंदर्भात काही अडचण उद्भवल्यास जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी | |

| | | |
|---|---|---|
| | यांनी संयुक्तरित्या चर्चा करुन आवश्यक तो निर्णय घ्यावा. एखाद्या बाबीवर एकमत न झाल्यास विभागीय आयुक्त यांनी निर्णय घ्यावा. | |
| २३ | **<u>कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती :</u>** | • मनुष्यबळ पुरविणाऱ्या बाहयस्थ संस्थेची नियुक्ती जिल्हाधिकारी करतील.<br>• मागील वर्षाच्या लेबर बजेटनुसार एप्रिलमध्ये जिल्ह्यांला लागणारे मनुष्यबळ जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संयुक्त बैठक घेऊन निश्चित करावे.<br>• त्याची विभागणी मागील वर्षात जो खर्च झालेला आहे त्याप्रमाणात जिल्हा परिषद व इतर यंत्रणानिहाय मनुष्यबळाची (प्रशासकीय खर्चाच्या मर्यादेत) विभागणी करुन द्यावी.<br>• वरीलप्रमाणे निश्चित केल्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेला बाहयस्थ संस्थेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे. तसेच कर्मचाऱ्यांची प्रतिक्षा यादी तयार करावी. एखादा कर्मचारी काम सोडून गेला किंवा अकार्यक्षम असल्यास अशा कर्मचा-यांना बदलण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील व त्याऐवजी प्रतिक्षा यादीतील उमेदवार बाह्यस्थ संस्थेकडून |

| | | |
|---|---|---|
| | | मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी प्राप्त करुन घ्यावा. तथापि, मंजूर संख्येचे मर्यादेपेक्षा जास्त मनुष्यबळ नेमता येणार नाही. <br>• मुख्य कार्यकारी अधिकारी यांना मंजूर संख्येपेक्षा जास्त मनुष्यबळ आवश्यक असल्यास जिल्हाधिकारी यांची मान्यता घ्यावी. जास्त मनुष्यबळ दिनाची निर्मिती होत असल्यास इतर यंत्रणेकरीता सुध्दा जिल्हाधिकारी यांनी मनुष्यबळाची नेमणुक करावी. <br>• मनुष्यबळाचा खर्च मर्यादेत ठेवण्याकरिता ऑक्टोबर मध्ये पुन्हा आढावा घेण्यात यावा व त्यानुसार मनुष्यबळ नेमण्याची कार्यवाही करावी. <br>• शासन परिपत्रक दिनांक ११.०२.२०१३ नुसार कंत्राटी आकृतीबंधा सोबत (परिशिष्ट-अ) नमुना म्हणून दिला आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. तथापि स्थानिक परिस्थिती नुसार यामध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना राहील. (मात्र ६% मर्यादा कटाक्षाने पालन करावे). <br>• जिल्ह्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची बाहयस्थ संस्थेमार्फत नियुक्ती संदर्भात अंतिमत: निर्णय जिल्हाधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | | यांचा राहील व तो बंधनकारक राहील. |
| २४ | **<u>कामाच्या ठिकाणी नामफलक लावणे :</u>** ग्रामपंचायत / पंचायत समिती / जिल्हा परिषद / कार्यान्वयीन यंत्रणांकडील केंद्र शासनाच्या दि.०७.०४.२०१७ च्या पत्रातील सूचनांचे पालन करुन यंत्रणा सुरु असलेल्या कामांच्या ठिकाणी तपशिलाचा उल्लेख असलेला फलक (Citizen Information Board) लावणे. | **<u>ग्रामपंचायत यंत्रणेकरीता</u>** - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>**<u>इतर यंत्रणेच्या कामांकरीता</u>** - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्यक |
| २५ | **<u>एकही काम नसलेल्या ग्रामपंचायतींमध्ये कामे घेणे :</u>** <u>काम चालू नसलेल्या ग्रामपंचायतीमध्ये चालू वर्षात कामे हाती घेणे, वैयक्तिक लाभाच्या योजना जास्तीत जास्त ग्रामपंचायतीमध्ये सुरु करणे .</u> | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| २६ | नियुक्त करण्यात आलेल्या सनदी लेखापालाकडून वार्षिक लेखा परिक्षण तसेच शासनाच्या निर्देशावरुन आयोजित विशेष लेखा परिक्षण (सर्व कामांसाठी) करणे | ग्रामपंचायत यंत्रणेकरीता - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>इतर यंत्रणेच्या कामांकरीता - जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक |
| २७ | **<u>प्रशिक्षण:</u>** | आयुक्त नरेगा नागपूर यांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी समन्वय करुन प्रशिक्षण प्रस्तावाबाबत कार्यक्रम निश्चित करावा. |

२. **<u>योजनेचा आढावा घेण्यास व चौकशी करण्यास जबाबदार व सक्षम अधिकारी :</u>**

| अ.क्र. | यंत्रणेचे नाव | कामकाजाचे मोजमाप करणारे अधिकारी | तालुका स्तरीय आढावा घेणारे अधिकारी | जिल्हा स्तरीय आढावा घेणारे अधिकारी | चौकशी व प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा परिषद यंत्रणा | शाखा अभियंता / उपअभियंता (बांधकाम / लघु-पाटबंधारे / पाणीपुरवठा), पंचायत समिती / जिल्हा परिषद | गटविकास अधिकारी | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा / ग्रामपंचायत), प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | इतर यंत्रणा | तालुका कृषी अधिकारी, लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण व वनक्षेत्रपाल / उपअभियंता शाखा अभियंता (जलसंपदा, जलसंधारण, सार्वजनिक बांधकाम) (राज्यस्तरीय) | तहसिलदार | उपजिल्हाधिकारी (रोहयो) जिल्हाधिकारी यांचेमार्फत | जिल्हाधिकारी |

३. निर्मित मनुष्यदिवसांच्या आधारावर नियुक्त करावयाच्या पदांची संख्या “परिशिष्ट-अ” मध्ये देण्यात आलेली आहे. त्यामध्ये दर्शविण्यात आलेली पदांची संख्या ही मार्गदर्शक स्वरुपाची समजविण्यात यावी. यामध्ये स्थानिक परिस्थिती विचारात घेता, पदे व पदसंख्या यामध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील. मात्र निर्मित मनुष्यबळाचा खर्च ६% प्रशासकीय खर्चाच्या मर्यादेच्या बाहेर जाणार नाही, याची

दक्षता घ्यावी. जिल्हा आणि तालुका पातळीवर कंत्राटी कर्मचा-यांच्या मानधनावरील खर्च प्रशासकीय खर्चासाठी उपलब्ध असलेल्या निधीच्या ६% च्या वर जाणार नाही याचे नियोजन करणे तसेच यापेक्षा जास्त खर्च होणार नाही, याचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी घ्यावी.

४. यंत्रणाने जास्तीत जास्त कामे करणेबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश दयावे.

५. पंचायत समिती कार्यालयातील विस्तार अधिकारी पंचायत यांचेवर त्यांच्या कार्यक्षेत्रातील नरेगाच्या कामाची जबाबदारी राहील. गट विकास अधिकारी त्याबाबत वेळोवळी आढावा घेतील. सहायक गट विकास अधिकारी यांच्या जबाबदारीबाबत स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश काढावेत.

६. जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक हे योजनेच्या अंमलबजावणीसाठी अंतिमत: जबाबदार राहतील.

७. विभागीय आयुक्त यांनी वरील बाबींचा जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नियमित होणाऱ्या बैठकीमध्ये आढावा घ्यावा.

८. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ६(३) नुसार सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ खालील रोजगार हमी योजना अंमलात आणताना अधिकारी / कर्मचारी यांना शिक्षा करण्याचा अधिकार आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२९१४२११२६३१६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Eknath Rajaram Dawale

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, cn=Eknath Rajaram Dawale
Date: 2017.10.04 11:56:16 +05'30'

**(एकनाथ डवले)**
**सचिव (रोहयो)**

**प्रति,**

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिवांचे स्वीय सहायक,
५) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई

६) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सर्व विभागीय आयुक्त.
८) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर.
९) प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पूणे
११) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक
१२) महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा)
१३) महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१४) महालेखापाल २ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१५) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून),
१६) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१८) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी तथा उप विकास आयुक्त (रोहयो)
१९) सर्व तहसिलदार
२०) सर्व गट विकास अधिकारी
२१) मुख्य अभियंता ल.पा. (स्था. स्तर) पूणे
२२) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पूणे
२३) सर्व उप सचिव, अवर सचिव, सहायक संचालक (लेखा), कक्ष अधिकारी, सांख्यिकीय अधिकारी (रोहयो प्रभाग), मंत्रालय, मुंबई - ३२.
२४) उपसंचालक / रोहयो-९ यांच्याकडे संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता अग्रेषित
२५) सारसंग्रहासाठी, मग्रारो-१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२६) निवडनस्ती, मग्रारो-३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

# निर्मित मनुष्यदिवसांच्या आधारावर नियुक्त करावयाच्या पदांची संख्या

## परिशिष्ट "अ"

| गट / स्तर (निर्माण झालेल्या दिवसांनुसार) | मागील वर्षात ब्लॉक (तहसिलसह) मध्ये निर्माण झालेले मनुष्यदिवस (लाखात) | कार्यक्रम व्यवस्थापक | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | तांत्रिक अधिकारी | लिपिक तथा डाटा ऐट्री ऑपरेटर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | ८.०० | १ | ४ | ९ | ४ | या पदांपैकी काही सहाय्यक कार्यक्रम अधिकारी तांत्रिक अधिकारी आणि संगणक डाटा एंट्री ऑपरेटर हे तहसील कार्यालयात असणे आवश्यक आहे. |
| ब | ५.०० ते ८.०० | १ | ३ | ७ | ३ | |
| क | ४.०० ते ५.०० | १ | ३ | ६ | ३ | |
| ड | २.५ ते ४.०० | १ | ३ | ५ | ३ | |
| इ | १.०० ते २.५ | --- | २ | ४ | २ | |
| फ | १.०० ते १.५ | --- | २ | ३ | २ | |
| प | १ लाखापेक्षा कमी | --- | १ | २ | २ | |